पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७८**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २९/०८/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २९/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे,

मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट, मा.खोत – प्र. सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.धानोरकर - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२०) महानगरपालिकेच्या पॅनेलवर स्ट्रक्चरल ऑडीटर म्हणून घेण्यास मान्यता देणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) गड किल्ले महाराष्ट्राचे हे पुस्तक खरेदी करणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) मा.स्थायी समिती क्र.३००० दि.२५/०७/२०१८ मधील दुरूस्तीबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३) थेरगाव मध्ये डांगेचौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या भोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे या कामासाठी तरतुद वर्गीकरण करणेबाबत.

----------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.जुंधारे (कार्यकारी अभियंता) ऑफिसर ऑफ द मन्थ, मा.पवार (प्र.कायदा सल्लागार) यांचा सेवानिवृत्ती निमित्त व मा.लांडे (मुख्य लेखापाल) यांचा पदोन्नतीद्वारे बदली झालेने मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, स्थायी समिती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.)

----------

ठराव क्रमांक - ३०८२ विषय क्रमांक - ०१
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र. पापु/६/कावि/९१/२०१८ दि.१६/०८/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३१/६/२०१७-१८ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र येथील लॅबोरेटरीकरीता रासायनिक व अणुजीव चाचण्या करणे करीता रसायने पुरवणेकामी मे.सावंत इंस्ट्रूमेंटस निविदा र.रू.२८,००,८५९/-(अक्षरी र.रू.अठ्ठावीस लाख आठशे एकोणसाठ फक्त) पेक्षा १०.००% जादा निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ०.८४% ने जादा दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३०,८०,९४५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८३ विषय क्रमांक - ०२
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – नगररचना
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/११/चिंचवड/२८९/२०१८ दि.२७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या पेठ क्र ३०, प्राथमिक शाळा क्र १ ची मागणी प्राधिकरणाकडे प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील दि.१२/०३/२०१८ अन्वये करणेत आली होती. तसेच मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरापलिका यांनी त्यांचे पत्र शिक्षण/सशिअ/१३६/ २०१८, दि.०२/०४/२०१८ नुसार सुद्धा मागणी करणेत आली होती. त्यास अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी, पिं.चिं.न.वि.प्राधिकरण यांनी त्यांचे संदर्भिय पत्रानुसार मौजे चिंचवड पेठ क्र.३०, प्राथमिक शाळा क्र.१ हा शालेसाठी आरक्षित भूखंड क्षेत्र ५०३७.०० चौ.मी. हा प्राधिकरण सभा क्र.२९३ मधील विषय क्र.१२ मधील ठरावानुसार उपरोक्त शैक्षणिक भूखंडासाठी देण्याचे भूखंडाचे दर हे निवासी दराचे ५०% याप्रमाणे आकारावे असे धोरण मंजूर करणेत आलेले आहे. त्यानुसार सदर भूखंडाच्या अधिमुल्यास सवलतीच्या दराने म्हणजे अधिमुल्याच्या ५०% दराने अधिमूल्य र.रू.६,१७,५३,६२०/- (अक्षरी र.रू.सहा कोटी सतरा लाख त्रेपन्न हजार सहाशे वीस फक्त) मनपा कडुन वसुल करून जागेचा

ताबा देणेबाबत मान्यता दिलेली आहे. सबब पेठ क्र.३०, प्राथमिक शाळा क्र.१ या भूखंडाचे क्षेत्रफळ ५०३७.०० चौ.मी. इतके असुन त्यापोटी र.रू.६,१७,५३,६२०/- इतके अधिमुल्य प्राधिकरणाकडे जमा करणे आवश्यक असल्याने सदरचे अधिमुल्य र.रू.६,१७,५३,६२०/- प्राधिकरणाकडे जमा करण्यासाठी तसेच त्यासाठी करावयाच्या भाडेपट्टपोटी येणा-या खर्चास (उदा. मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, वकील फी, झेरॉक्स इ.) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८४ विषय क्रमांक - ०३
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/७/कावि/१४५/२०१८ दि.१६/०८/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

६ उर्दू माध्यम विदयालयासाठी सन २०१८–२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता नेमणूक केलेल्या १८ उर्दू माध्यम शिक्षकांना एकत्रित ररू.८,०००/- (अक्षरी र.रू.आठ हजार फक्त) मानधन मिळणेकामी व त्यांच्या मानधनापोटी येणा-या अंदाजे खर्चास किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८५ विषय क्रमांक - ०४
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०३/२०१८ दि.१६/०८/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.5/2/2018-19 अन्वये मनपा प्रशासकीय इमारतीतील ओटीस मेक उदवाहक क्रमांक 01 ते 04 ची व महानगरपालिका सभागृहासाठी वापरात असलेल्या कोने मेक उदवाहकाची 3 वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती कामी (2018-2021) मे.चैतन्य इलेक्ट्रीकल ऍण्ड सिव्हिल लेबर कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.33,08,094/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख आठ हजार चौ-याण्णव फक्त) पेक्षा 5.4% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.31,29,457/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८६ विषय क्रमांक - ०५
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे जावक क्र.पअक/१/कावि/२२०/२०१८ दि.२१/०८/२०१८

मा.अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV23/2-2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील क, ड, इ पंपीग स्टेशनमधील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.नरळे विष्णु विठोबा यांचेकडुन नि.र.रु.६३,०३,७६६/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ लाख तीन हजार सातशे सहासष्ठ फक्त) पेक्षा -२५.५२% कमी या दराने प्राप्त झालेली आहे. सदर ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु ४६,९५,०४५/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८७ विषय क्रमांक - ०६
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त भांडार यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/३१७/२०१८ दि.२१/०८/२०१८

मा.सहा.आयुक्त भांडार यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे दवाखाने रुग्णालयाकरिता आवश्यक असणारे Touch HB Machine ४३ नग खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदेप्रमाणे Biosense Technologies Pvt Ltd यांनी सादर केलेले लघुत्तम दर र.रु.३०,१९५/- साठी निविदा अट क्र.१७ नुसार प्रथम वर्ष गॅरंटी/वॉरंटी व पुढील ३ वर्षाकरिता वार्षीक देखभाल व दुरूस्तीकामी १% एएमसी करिता करारनामा करुन व अनामत रक्कम घेऊन येणारे र.रु.१२,९८,३८५/- (अक्षरी र.रू.बारा लाख अठ्याण्णव हजार तीनशे पंच्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८८ विषय क्रमांक - ०७
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त भांडार यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/३१६/२०१८ दि.२१/०८/२०१८

विष्य – मनपाचे नविन भोसरी रुग्णालयाकरिता आवश्यक असणारे High pressure autoclave खरेदी करणेबाबत.

विषय क्र.७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०८९ विषय क्रमांक - ०८
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – क्रीडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.०८ दि.१६/८/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात येत असतो या दिवशी गुणवंत शिक्षक/ शिक्षिकांना पुरस्कार दिला जातो त्याच बरोबर आदर्श शाळा पुरस्कार देण्यात येत असतो तसेच उपस्थित शिक्षक वर्गाला चहापान, निमंत्रण पत्रिका इ. आणि पारितोषिक वितरण समारंभासाठी घेण्यात येणा-या हॉलचे भाडे इ.साठी खर्च येत असतो याकामी शिक्षक दिन या लेखाशिर्षाखाली र.रु.५,००,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) तरतूद करण्यात आलेली आहे. यातुन सदर खर्च भागविण्यात येणार आहे. त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९० विषय क्रमांक - ०९
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.काशा/३/कावि/५९६/२०१८ दि.२१/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाकडील वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागामार्फत मनपाकडील विविध विभागाचे वापरात असलेली सर्व प्रकारची वाहने दुरुस्ती करणेत येतात सदरची वाहने वेगवेगळ्या विभागामध्ये त्यांचे कार्यालयीन कामासाठी वापर करीत असतात त्याची त्वरीत दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्याकरीता सन २०१८ ते २०२१ या तीन वर्ष कालावधीकरिता अ गटातील वाहनांची दुरुस्ती करणेकामी एजन्सी निश्चित करणेकामी निविदा सुचना क्र.१/२०१८-१९ ई-टेंडरिंग द्वारे प्रसिद्ध करुन दर मागविणेत आले असून त्यामध्ये मे.युवराज मोटर्स – २.००% जास्त असल्याने त्यांना इकडील दि.१/०८/२०१८ च्या पत्रान्वये दर कमी करणेबाबत पत्र देणेत आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचेकडील दि.१/०८/२०१८ च्या पत्रान्वये महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या

दरापेक्षा आणखीन ०.२५% दर कमी करुन दिलेले आहेत. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता पिंपरी चिंचवड मनपाकडील कार/जीप इत्यादी प्रकारची वाहन दुरुस्ती करण्याकरिता (अ गट) लघुत्तम निविदा धारक मे.युवराज मोटर्स यांचे निविदा रक्कमे पेक्षा ०.२५% कमी दर प्राप्त झालेले आहेत. (तीन वर्षासाठी नि.र.रु.१,५०,०००,००/-) सदर प्राप्त झालेल्या लघुत्तम दराचे निविदाधारक मे.युवराज मोटर्स यांचे दर स्विकृत करून त्यांचे समवेत सन २०१८ ते २०२१ या तीन वर्ष कालावधीकरीता करारनामा करुन घेवून कामे करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.१,५०,०००,००/- (अक्षरी र.रू.एक कोटी पन्नास लाख फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९१ विषय क्रमांक - १०

दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/९६७३/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दि.०८/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये धन्वंतरी स्वास्थय योजना लेखाशिर्षावर र.रू.१५ कोटी तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे व प्रलंबित बिले त्वरीत अदायगी बाबत वाढीव तरतुदीची मागणी केलेली आहे. विभागाची तातडीने बिले अदा करावयाची बाब विचारात घेता सन २०१७-१८ अखेर सुमारे र.रू.७२५ कोटी शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापूर्वी अखर्चीत र.रू.५०० कोटी वितरीत करण्यात आलेले आहेत. वार्षीक लेखे अंतिम व्हायचे असल्याने उर्वरीत रक्कम निर्धारीत करता येत नसली तरी सुमारे र.रू.२२५ कोटी शिल्लक राहण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने प्रभाग/ मुख्यालयातील भांडवली/ महसुली/ विशेष योजना प अंदाजपत्रक यातून र.रू.२,११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणेबाबतचे विषयपत्र लेखा/६/कावि/७१७४/२०१८ दि.१८/०६/२०१८ अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेचे मान्यतेकामी सादर करण्यात आलेले होते. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२८२४ दि.१९/०६/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.२३६ दि.२०/०७/२०१८ अन्वये मा.महापालिका सभा ठराव क्र.२३६ दि.२२/०६/२०१८ मधील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अनुक्रमांक ५,६,७ ची कामे वगळुन ठराव मंजुर करणेत आलेला आहे. अनुक्रमांक ५,६,७ र.रू.९ कोटी आहे. र.रू.९ कोटी पैकी र.रू.३ कोटी शिल्लक आहे. सदरची शिल्लक रक्कम रू.३ कोटी धन्वंतरी स्वास्थय योजना करीता वर्गीकरण करून वाढीव देणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९२ विषय क्रमांक - ११
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१०/२०१८ दि.२३/०८/२०१८

मा.अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.20/2/2017-18 अन्वये प्रभाग क्र.26 मोहननगर भागातील चौकात व आवश्यक त्या ठिकाणी CCTV बसविणेकामी मे.फिनिक्स इंफ्रास्ट्रक्चर्स नि.र.रू.89,70,897/- (अक्षरी र.रु. एकोणनव्वद लाख सत्तर हजार आठशे सत्याण्णव फक्त) पेक्षा 3.5% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.86,56,916/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९३ विषय क्रमांक - १२
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/९/२०१८ दि.२३/०८/२०१८

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.20/4/2017-18 अन्वये अ प्रभाग कार्यक्षेत्रातील निगडी प्राधिकरण उपविभागामधील आवश्यक चौकामध्ये सार्वजनिक सुरक्षिततेकरिता CCTV बसविणे व नियंत्रक पोलिस ठाणे कडे जोडणेकामी मे.फिनिक्स इंन्फ्रास्ट्रक्चर्स नि.र.रू.41,89,120/- (अक्षरी र.रु.एकेचाळीस लाख एकोणनव्वद हजार एकशे वीस फक्त) पेक्षा 3.6% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.40,38,312/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९४ विषय क्रमांक - १३
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५७०/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे शिक्षण मंडळ कार्यालयाकडील प्राथमिक शाळांसाठी थ्री सिटर खुर्ची खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वरुन BID Upload करुन खरेदी करणेस मान्यता दिलेनुसार बिड नंबर GEM/2018/B/44098 मे रेखा इंजिनिअरींग वर्क्स हे लघुत्तम (L1) यांचे थ्री सिटर खुर्ची साठी प्रती नग र.रु.14,409/- प्रमाणे 303 नगासाठी एकुण र.रु.43,65,927/- (अक्षरी र.रु. त्रेचाळीस लाख पासष्ठ हजार नऊशे सत्तावीस फक्त) चे खर्चास मान्यता व त्यांचेबरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९५ विषय क्रमांक - १४
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१३८/२०१८ दि.१८/०८/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जुलै २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३८/२०१८ दि.१८.०८.२०१८ अन्वये पाठविलेला अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९६ विषय क्रमांक - १५
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/८३०/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या

विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९७ विषय क्रमांक - १६

दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/२७९/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०३/०२/२०१७-१८ मधील काम क्र.१ अन्वये, पिंपळे निलख येथील बाणेर पुलाजवळील मोकळया जागेत उद्यान विकसित करणेकामी मे.बी.व्ही.जी इंडिया निवीदा र.रु.३,८४,१९,१६०/- (अक्षरी र.रू.तीन कोटी चौ-याऐंशी लाख एकोणीस हजार एकशे साठ फक्त) पेक्षा ०५.८९% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४,०६,८२,०४९/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९८ विषय क्रमांक - १७

दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/२७१/२०१८ दि.२३/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (०१ ते ०८) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०९९ विषय क्रमांक - १८
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/४००/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालयातील तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (मुलांचे), मोरवाडी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मुलींच्या, कासारवाडी मधील विद्यार्थ्यांना दि.१५ ऑगस्ट २०१८ स्वातंत्र्य दिना निमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ब्रिटानिया गुड डे रिच बटर ६६ ग्रॅम बिस्कीटे पुरवठा करणेकामी नामांकीत कपंनी ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमि. बेंगलोर या उत्पादीत कंपनीचे पिंपरी चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.भक्ती एंटरप्रायजेस, शिवतेजनगर, चिंचवड स्टेशन, पुणे – १९ यांचे कडून करारनामा न करता, सरळ थेट पध्दतीने खरेदी केले असल्याने प्रति नग ९.०९ दर याप्रमाणे एकुण ९,३९२ विद्यार्थ्यांचे एकूण र.रू.८५,३७३/- (अक्षरी र.रू.पंच्याऐंशी हजार तीनशे त्र्याहत्तर फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१०० विषय क्रमांक - १९
दिनांक – २९/०८/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/२२१/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.2/1-2018-19 अन्वये मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्रमांक 13 मध्ये विकसित करणेकामी (विद्युत विषयक कामे) मे इलेक्ट्रो मॅकेनिक्स नि.र.रू.1,86,46,454/- (अक्षरी र.रु. एक कोटी शहाऐंशी लाख शेहचाळीस हजार चारशे चौपन्न फक्त) पेक्षा 11.7% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.1,64,64,819/- पर्यंत काम करून घेणेस या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -३१०१ विषय क्रमांक - २०

दिनांक – २९/०८/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या विविध इमारती, पूल प्रकल्प इत्यादीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी श्री.आतकिरे कौशल किसन यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर स्ट्रक्चरल ऑडीटर म्हणून घेण्यास व आवश्यकतेनुसार त्यांना स्ट्रक्चरल ऑडीटची कामे देण्यास तसेच त्याबाबत त्यांना नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१०२ विषय क्रमांक - २१

दिनांक – २९/०८/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक तसेच विद्यार्थी यांना महाराष्ट्रातील गडकिल्ले यांची माहिती मिळावी याकरिता दुर्गमहर्षी श्री. प्रमोद मांडे यांचे गडकिल्ले महाराष्ट्राचे हे पुस्तक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व वाचनालये/ ग्रंथालये तसेच मनपा माध्यमिक शाळांकरिता प्रत्येकी दोन पुस्तके मराठीदेशा फाऊंडेशन, वाकड, पुणे यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकरीता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच याबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही संबंधित विभागांनी करणेत यावी असे निर्देश देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१०३ विषय क्रमांक - २२

दिनांक – २९/०८/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.३००० दि.२५/०७/२०१८ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. प्रस्तुत विषयातील कार्यक्रम हा दि.२३/०४/२०१८ ऐवजी २३/०७/२०१८ रोजी झाला असल्यामुळे "दि.२३/०४/२०१८" हा मजकूर वगळून त्याऐवजी "दि.२३/०७/२०१८" असा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१०४ विषय क्रमांक - २३

दिनांक – २९/०८/२०१८ विभाग - लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९८४७/२०१८ दि.२९/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता, "ग क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य यांनी दि.४/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये “थेरगाव मध्ये डांगे चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळया भोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे” या कामास मा.स्थायी समितीने र.रु.३,४८,१३,४४७/- इतका सुधारीत खर्चास मान्यता मिळाली आहे. सदरचे कामास सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.१५,००,०००/- इतकी तरतुद असुन सदरचे उर्वरीत काम पुर्ण करणेसाठी र.रु.१,१५,००,०००/- इतक्या तरतुदीची आवश्यकता आहे. सदर कामास मा.आयुक्त यांचे मंजुर प्रस्तावान्वये दि.३०/१०/२०१८ पर्यंत मुदत वाढ मंजुर करण्यात आली आहे. सदरचे काम वाढीव मुदतीमध्ये पुर्ण करणेत येणार असुन त्यास अंदाजपत्रकातील उपलब्ध असलेली र.रु.१५,००,०००/- इतकी तरतुद कमी पडणार आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी फक्त) वर्गीकरण करणेस मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१०३९/२०१८
दिनांक - ३०/०८/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.स्था/उद्यान/कावि/२७१/२०१८ दि.२३/८/२०१८ विषय क्र.१७ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य उद्यान
क्र.स्था/उद्यान/ २७१/२०१८
दि. /०८/२०१८

प्रपत्र अ ( १ ते ०८ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.पी.जे.मोटवानी | ०७/०१/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | २९/०६/२०१८ | स्था/उद्यान/२४९/२०१८ | ०४/०७/२०१८ | २०३६०३८/- | २८.४६ | %कमी | १४५६५८२/- |
| २ | मे.एस.व्ही.सातपुते डेव्हलपर्स | ०७/०२/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | १६/०७/२०१८ | स्था/उद्यान/२६०/२०१८ | २५/०७/२०१८ | २०३५७०५/- | २५.२० | %कमी | १५२२७०७/- |
| ३ | मे.शिवम एंटरप्रायजेस | ०७/०३/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | १८/०७/२०१८ | स्था/उद्यान/२६१/२०१८ | २५/०७/२०१८ | २०३५९४४/- | २३.५० | %कमी | १५५७४९७/- |
| ४ | मे.शिवम एंटरप्रायजेस | ०७/०४/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | १८/०७/२०१८ | स्था/उद्यान/२४२/२०१८ | २५/०७/२०१८ | २०३५७८८/- | २५.२५ | %कमी | १५२१७५२/- |
| ५ | मे.शिवम एंटरप्रायजेस | ०७/०५/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | १६/०७/२०१८ | स्था/उद्यान/२६३/२०१८ | २५/०७/२०१८ | २०३४१७३/- | २३.५० | %कमी | १५५६१४२/- |
| ६ | मे.पी.जे.मोटवानी | ०७/०६/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | २९/०६/२०१८ | स्था/उद्यान/२५०/२०१८ | ०४/०७/२०१८ | २०३३२६८/- | २७.१८ | %कमी | १४८०६२६/- |
| ७ | मे.प्रकाश कॉन्ट्रॅक्टर | ०७/०७/२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | २९/०६/२०१८ | स्था/उद्यान/२४८/२०१८ | ०३/०७/२०१८ | २०३५१०६/- | ९.९९ | %कमी | १८३१७९९/- |
| ८ | मे.दिप एंटरप्रायजेस | ०७/०८ /२०१८-१९ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह,क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत वृक्षरोपणासाठी खडडे खोदणे व माती भरणे. | १२/०७/२०१८ | स्था/उद्यान/२५९/२०१८ | २५/०७/२०१८ | २०३५९५५/- | १३.१० | %कमी | १७६९२४५/- |

अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८